**OFFICE OF THE SUPDT. OF POLICE JALGAON**
**पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगाव**
**Office Ph -0257-2220411 Fax - 0257-2220511**
**Email ID - sp.jalgaon@mahapolice.gov.in**

**प्रेस नोट :-** **दिनांक -०६/१०/२०२५**

---

प्रति,

संपादक,

दैनिक...............

विषय :- स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव यांनी भुसावळ शहर पो.स्टे. येथील खुनाचे गुन्हयातील आरोपी अटक केले बाबत.

---ooooo-----

दि.०५/१०/२०२५ रोजी मयत नामे जितेंद्र राजेंद्र साळुंखे रा. केसी पार्क जळगांव व आरोपी नामे १) राजु ऊर्फ बाबु अशोक सपकाळे, रा. क्रांती चौक, शिवाजी नगर,जळगांव २) मयुर दिपक अलोने रा. बारसे कॉलनी, शिवाजी नगर, जळगाव हे आरोपी क्र. ३ दिपक बसंत शंकपाळ रा. महादेव टेकडी, कंडारी ता. भुसावळ याचे घरी जेवणाकरीता गेले होते. नमुद मयत व आरोपी यांच्या कोणत्यातरी कारणावरुन वाद झाल्याने नमुद आरोपी यांनी यातील मयत यास घातक हत्याराने गंभीर दुखापत करुन जिवे ठार करुन फरार झाले होते.

स्थानिक गुन्हे शाखेचे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री राहुल गायकवाड यांनी नमुद फरार आरोपी यांना अटक करणे कामी पोउपनि. सोपान गोरे यांचे नेतृत्वात पथक नियुक्त करुन त्यांना नमुद फरार आरोपी यांना अटक करण्याबाबत आदेशीत केले होते. पोउपनि. सोपान गोरे व पोह/सलीम तडवी, पोअ/रतनहरी गिते, पोअ/सिध्देश्वर डापकर, पोअ/मयुर निकम यांनी आरोपी नामे १) राजु ऊर्फ बाबु अशोक सपकाळे, रा. क्रांती चौक, शिवाजी नगर,जळगांव २) मयुर दिपक अलोने रा. बारसे कॉलनी, शिवाजी नगर, जळगाव यांचा शोध घेवुन त्यांना ताब्यात घेवुन पुढील तपासकामी भुसावळ शहर पो.स्टे. यांचे ताब्यात दिले आहे.

सदरची कार्यवाही ही श्री डॉ. महेश्वर रेड्डी, मा. पोलीस अधीक्षक, सो. जळगांव , श्री अशोक नखाते, मा. अपर पोलीस अधिक्षक, जळगांव परीमंडळ, श्री संदीप गावीत, उपविभागीय पोलीस अधिकारी, भुसावळ विभाग, श्री राहुल गायकवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, जळगांव यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि. सोपान गोरे व पोह/सलीम तडवी, पोअ/रतनहरी गिते, पोअ/सिध्देश्वर डापकर, पोअ/मयुर निकम यांनी केली आहे.

जनसंपर्क अधिकारी,
जळगांव जिल्हा पोलीस